सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
RNI. NO. MAHBIL /25/A0192
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
Postal Regd. No. JAL/443/2025-2027
वर्ष १ ले | अंक : ३५२ | सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १,४९,५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,३९,०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,१५,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३५०/-
भाव प्रती १० ग्राम

## निवेदन

आज सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी गणेशोत्सवाला प्रारंभ होत आहे. त्याअनुषंगाने गणपती बाप्पांसंदर्भातील विशेष माहिती देणारा मजकूर प्रसिध्द करीत आहोत. त्यामुळे नियमित प्रसिध्द होणारे 'मसाला पान' अंकात देता आले नाही.
– संपादक

## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. राहुल पाटील**
शिक्षक/पत्रकार



**श्री. जितेंद्र साळुंके**
मंगल सेवेकरी



**श्री. संजय नांद्रे**
अमळनेर



**श्री. मुकेश पुरोहित**
अमळनेर

# आले आले हो आले... गणपती बाप्पा आले!

## आजपासून गणेशोत्सव सुरू; यंदा १० नव्हे; तर १२ दिवस बाप्पांचा मुक्काम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अवघ्या काही तासांतच आबालवृद्धांसह साऱ्या गणेशभक्तांची आतुरता संपणार आहे. कारण सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी संपूर्ण राज्यात गणेशोत्सवाला सुरूवात होणार आहे. महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांमध्ये गणेश चतुर्थी मोठ्या थाटामाटाने साजरी केली जाणार असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दिवशी गणेशभक्त भक्तीभावाने बाप्पांना घरी वाजतगाजत आणतील. विघ्नहर्ता गणपती बाप्पांच्या मूर्तींची घरोघरी प्रतिष्ठापना करतील आणि विधीपूर्वक त्यांची पूजा करतील. गणेश चतुर्थीला सुरू होणारा गणेशोत्सव यंदा १० नव्हे, तर तब्बल १२ दिवसांचा असल्याने बाप्पा १२ दिवसांसाठी मुक्कामी राहणार आहेत. ज्यामध्ये ऋषिपंचमी, गौरी आगमन-विसर्जन, त्यानंतर शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी अर्थात अनंत चतुर्दशीला बाप्पांचे विसर्जन होईल.




वैदिक पंचांगानुसार गणेशोत्सवाची सुरूवात म्हणजेच गणेश चतुर्थी ही भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या चतुर्थी तिथीला साजरी केली जाते. भाद्रपद शुक्ल चतुर्दशीला समाप्त होते. यंदाच्या गणेशोत्सवात गणपती बाप्पांच्या आगमनासोबतच ऋषिपंचमी ते गौरी पूजनाचा उत्साहही पाहायला मिळणार आहे. त्यामुळे सप्टेंबरमधील हे धार्मिक दिवस भक्तांसाठी विशेष महत्त्वाचे ठरणार आहेत.

### गणेश चतुर्थीपासून ज्येष्ठागौरी पूजनापर्यंत ते अनंत चतुर्दशीपर्यंत महत्त्वाचे सण

सप्टेंबर २०२६ हा धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा महिना आहे. या काळात हरितालिका, गणेश चतुर्थी, ऋषिपंचमी आणि ज्येष्ठागौरी पूजनासह अनेक महत्त्वाचे सण साजरे केले जाणार आहेत. यंदा सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीगणेश चतुर्थी साजरी होणार आहे. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी ऋषिपंचमी आहे. गुरुवार, १७ सप्टेंबर रोजी ज्येष्ठागौरींचे आगमन होऊन शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ रोजी त्यांचे पूजन केले जाईल. गौरीला गणपती बापांच्या माता पार्वती यांचे रूप मानले जाते. तसेच त्यांना महालक्ष्मी असेही संबोधले जाते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात गौरी पूजनालाही विशेष धार्मिक महत्त्व आहे. शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठागौरींचे विसर्जन होईल. याच दिवशी भाद्रपद शुद्ध अष्टमी म्हणजेच दुर्गाष्टमी साजरी केली जाईल. शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी असल्याने या दिवशी गणपती बाप्पांना निरोप देत यंदाच्या गणेशोत्सवाची सांगता होईल.

## काल रात्री गणपती बाप्पा होते टिळकांशी भांडत...।



काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत,
आपल्या अडचणींची कैफियत
होते पोटतिडकीने मांडत ॥

देवघरातून तू मला
बाहेर का आणलेस?
तुमच्या लाडक्या देवाचे कौतुक
कशाला चार-चौघांत मांडलेस?

गायलास तू सुरूवातीला
ताल-सुरात आरत्या,
केलीस साधी फुलांची आरास
भोवती रंगीत बत्त्या॥

खूप मस्त छान असायचे
आनंद वाटायचा येण्यात,
सुख-शांती-समाधान मिळे
चैतन्य तुला देण्यात॥

दहा दिवस उत्सवाचे म्हणजे
असे, दिव्यत्वाची रंगत...
काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत॥

पूर्वी प्रवचन, कीर्तन, गायनाने
मंगलमयी वाटायचे,
प्रबोधक, उद्‌बोधक भाषणांनी
विचार उंची गाठायचे॥

आत्ता सारखा हिडीसपणा
मुळीच नव्हता तेव्हा,
शांताबाईच्याच नावाचा
आता अखंड धावा ॥

पीतांबर, शेला, मुकुट
हे माझे खरे रूप,
शर्ट, पॅन्ट, टोपी, पागोटे
धिगाण्याला फक्त हुरूप॥

शाडूची माती... नैसर्गिक रंग
गायब आता झाले कुठे?
लायटिंग केलेल्या देखाव्याने
मला दरदरून घाम फुटे॥

श्रद्धा, भक्तीभाव, आदर मनीचा
गेला ना रे सांडत...
काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत॥

माणसा-माणसांनी एकत्र यावे
एकमेकांना समजून घ्यावे,
देव-घेव विचारांची करताना
सारे कसे एक व्हावे॥

जातिभेद नसावा...
बंधुभाव असावा,
सहिष्णुतेच्या विचारांनी
नवा गाव वसावा॥

मनातला विचार तुझ्या
खरोखर होता मोठा,
पण, आज मात्र खऱ्या
विचारांनाच
बघ मिळाला आहे फाटा॥

पूर्वी विचारांबरोबर असायची
खाण्यापिण्याचीही रेलचेल,
आता मात्र देखाव्यांमागे
दडलेला असतो काळा खेळ॥

पूर्वी बदल म्हणून असायचे
पोहे-चिवडा-चहा-कॉफी...
साग्रसंगीत जेवणासोबत
लाडू-मोदक-पेढे-बर्फी॥

आता, रात्री भरले जातात
पडद्यामागे मद्याचे पेले,
डी.जे.वर नाचत असतात
माजलेले दादांचे चेले॥

नको पडूस तू असल्या फंदात
तेव्हाच मी होतो सांगत...
काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत॥

कशासाठी उत्सव असा
सांग ना रे बांधलास?
देवघरातून गल्लोगल्ली
डाव माझा मांडलास॥

दहा दिवस कानठळ्यांनी
होतो मला आजार,
व्यवहारी दुनिया इथली,
इथे चालतो लाखोंचा बाजार॥

रीतिरिवाज, आदर-सत्कार,
मांगल्याचा नाही पत्ता,
देवघराऐवजी माझा
रस्त्यावरती सजतो कट्टा॥

जुगार-दारू-सट्टा-मट्टा-
अनैतिकतेला येतो ऊत,
देवाऐवजी दैत्याचेच मग
मानेवरती चढते भूत॥
सामाजिक बाजू सोडून सुटतो
राजकारणालाच इथे पेव,
गौरी-गणपती सण म्हणजे-
गैरव्यवहाराची ठेव-रेव॥

नको रे बाबा, नको मला हा
मोठेपणाचा तुझा उत्सव,
मला आपले तू माझ्या जागी
परत एकदा नेऊन बसव॥

कर बाबा कर माझी सुटका
नको मला यांची संगत...
काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत॥

आपल्या अडचणींची कैफियत
होता पोटतिडकीने मांडत,
काल रात्री गणपती बाप्पा
होते टिळकांशी भांडत ॥

# सबस्टेशनपासून अवघ्या १० मीटरवरील 'डीटीसी'चा वीजपुरवठा वारंवार खंडित

## दोन वर्षांपासून ग्राहक त्रस्त; निवेदन देऊनही उपाययोजना नसल्याने आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सबस्टेशनपासून अवघ्या सुमारे १० मीटर अंतरावर असलेल्या डीटीसी क्र. ४२३२०७४ वरील ग्राहकांना गेल्या जवळपास दोन वर्षांपासून वारंवार वीज खंडिततेचा सामना करावा लागत आहे. याबाबत महावितरणकडे लेखी निवेदन देऊनही अद्याप ठोस उपाययोजना न झाल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या 'डीटीसी'चा वीजपुरवठा सध्या सानेनगर फिडरवरून केला जातो. हा फिडर सबस्टेशनपासून पुढे सुमारे पाच किलोमीटरचा शेती क्षेत्रातून जात असल्याने या मार्गावर बिघाड झाल्यास फॉल्ट शोधण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी महावितरणच्या पथकाला मोठा वेळ लागतो. त्यामुळे डीटीसीवरील ग्राहकांचा वीजपुरवठा दोन ते तीन तास खंडित होत असल्याची तक्रार आहे.



विशेष म्हणजे परिसरातील इतर भागांत वीजपुरवठा सुरू असताना केवळ डीटीसी क्र. ४२३२०७४ वरील ग्राहकांना वारंवार वीजखंडिततेचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात ही समस्या आणखी गंभीर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### २७ मे रोजीच दिले होते निवेदन

या समस्येबाबत २७ मे २०२६ रोजी महावितरणच्या अमळनेर शहर कक्ष-२ येथील सहाय्यक अभियंत्यांकडे लेखी निवेदन देण्यात आले होते. सदर डीटीसीचा वीजपुरवठा जवळील उपलब्ध फिडरवर स्थानांतरित केल्यास वारंवार होणारी गैरसोय कमी होऊ शकते, अशी मागणी करण्यात आली होती. सानेनगर फिडरवरील घरगुती डीटीसी आणि सबस्टेशनजवळील संबंधित 'डीटीसी' यांच्यातील अंतर सुमारे ५ ते ५.५ किलोमीटर असल्याने वीजपुरवठ्याची पुनर्रचना करणे तांत्रिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य ठरू शकते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले होते.

### तीन तास वीज गायब

निवेदन देऊन अनेक महिने उलटले तरी अपेक्षित कार्यवाही न झाल्याने ग्राहकांची नाराजी वाढली आहे. दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० या कालावधीतही या डीटीसीवरील वीजपुरवठा तब्बल तीन तास खंडित राहिला. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामकाजात मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. सबस्टेशनच्या अगदी जवळ डीटीसी असूनही केवळ फिडर जोडणीमुळे आम्हाला वारंवार तासन्तास वीजखंडिततेचा सामना करावा लागत आहे. शेजारील परिसरात वीज सुरू असताना आमचाच परिसर अंधारात राहतो. यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी स्थानिक ग्राहकांनी केली आहे.

### तांत्रिक आढावा घेण्याची मागणी

महावितरण प्रशासनाने डीटीसी क्र. ४२३२०७४ च्या फिडर जोडणीचा तातडीने तांत्रिक आढावा घेऊन शक्य असल्यास जवळील फिडरवर वीजपुरवठा स्थानांतरित करावा. तसेच कायमस्वरूपी उपाय होईपर्यंत वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेवर तात्पुरत्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे. समस्या तातडीने सोडविली नाही तर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही ग्राहकांनी दिला आहे.



# बाप्पा झाले शिक्षक...

## हातात पुस्तक घेऊन ज्ञानाची वाट दाखविताना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणपती बाप्पांच्या हातात पुस्तक... 'शिक्षण हीच खरी भक्ती' असा अनोखा संदेश. अमळनेर येथील न्यू व्हीजन स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकणारी विद्यार्थिनी मनुजा राजपूत हिने शाडू मातीपासून गणरायांची आकर्षक मूर्ती साकारली आहे. विशेष म्हणजे हातात पुस्तक घेतलेल्या या गणरायांच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि भावमुद्रा पाहता जणू बाप्पा स्वतःच शिक्षकाच्या भूमिकेत येऊन विद्यार्थ्यांना शिकवत असल्याचा भास होतो. या अनोख्या कलाकृतीतून विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा आणि ज्ञानदानाचा संदेश देण्यात आला आहे.

## रस्त्यावर मोकाट जनावरे सोडल्यास दंडात्मक कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका दिवसागणिक वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेने जनावरांच्या मालकांना तातडीची सूचना देत दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे. यासंदर्भात पालिकेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकानुसार शहर हद्दीत गाय, बैलांसह इतर जनावरे रस्त्यावर मोकाट सोडू नयेत. जनावरे रस्त्यावर फिरताना आढळल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होण्यासोबतच नागरिकांच्या जीवितासही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जनावरांच्या मालकांनी (पान २ वर)

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# तापाने फणफणलेले मोहम्मद रफी, तरी गायले गणपतींचे ते कल्ट गाणे

## गेल्या ४५ वर्षांपासून आहे गणेशोत्सवाची शान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज गायक मोहम्मद रफी यांच्या आवाजाची जादू आजही कायम आहे. त्यांच्या सदाबहार गाण्यांपासून ते भक्तिगीतांपर्यंत अनेक गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. गणेशोत्सवातही रफींच्या आवाजातील एका गाण्याला विशेष महत्त्व आहे. तब्बल ४५ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या गाण्याशिवाय आजही अनेक गणेशोत्सव अपूर्ण आहेत. गल्लोगल्लीतील गणपती मंडपांपासून ते गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीपर्यंत हे गाणे आवर्जून ऐकायला मिळते. या गाण्याच्या रेकॉर्डिंगवेळी गायक मोहम्मद रफी तापाने फणफणत होते. तरीही त्यांनी हे गाणे



गायले आणि ते गाणे श्रोत्यांसमोर येताच कल्ट ठरले. आपण ज्या गाण्याविषयी बोलतो आहोत ते गाणे म्हणजे १९८१ मध्ये आलेल्या 'हम से बढ़कर कौन' या सिनेमातील 'देवा हो देवा गणपती देवा, तुमसे बढ़कर कौन'. भक्तीभावाने भरलेले, उत्साह आणि दमदार संगीत यामुळे हे गाणे गणेशोत्सवातील खास ठरले. आज ४५ वर्षांनीही हे गाणे तितकेच लोकप्रिय आहे. गणपतींच्या मंडपांमध्ये आजही हे गाणे वाजवले जाते. त्यावर गणेशभक्त उत्साहाने नाचताना दिसतात.

'देवा हो देवा गणपती देवा' हे गाणे रेकॉर्ड करताना मोहम्मद रफी तापाने फणफणले होते. प्रकृती ठीक नसतानाही त्यांनी आपले काम आणि कमिटमेंट याला प्राधान्य दिले. अंगात ताप असताना त्यांनी गाण्याचे रेकॉर्डिंग पूर्ण केले. मोहम्मद रफी आपल्या गायकीकडे केवळ काम म्हणून पाहत नव्हते, तर ती एक जबाबदारी असल्याचे मानत होते. या गाण्याला मोहम्मद रफी यांच्यासोबत आशा भोसले, भूपिंदर सिंह, शैलेंद्र सिंह आणि अपन चक्रवर्ती यांनीही आपला आवाज दिला आहे. अनेक दिग्गज गायकांच्या आवाजामुळे गाण्याला वेगळीच उंची मिळाली.

सिनेमात हे गाणे मिथुन चक्रवर्ती, डॅनी डेन्जोंग्पा, रंजीत आणि अमजद खान यांच्यावर शूट करण्यात आले आहे. गाण्यातील या कलाकारांचा उत्साह आणि गाण्याची भक्तीमय ऊर्जा यामुळे हे गाणे कायमच खास ठरले. 'हम से बढ़कर कौन' हा १९८१ मध्ये प्रदर्शित झालेला ॲक्शन-ॲडव्हेंचर सिनेमा आहे. दीपक बाहरी यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते.

चित्रपटात मिथुन चक्रवर्ती, विजयेंद्र घाटगे, रंजीता, अमजद खान, डॅनी डेन्जोंग्पा, काजल किरण आणि रंजीत यांसारख्या कलाकारांनी भूमिका साकारल्या होत्या.

## संपादकीय

# सार्वजनिक उत्सवातील उत्साह आणि कसोटी

संपूर्ण राज्यात आता गणेशोत्सवाची धामधूम सुरू होत आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनामध्ये गणेशोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशात सर्वाधिक उत्साहाने किंबहुना सर्वाधिक लोकसहभागाने साजरा होणारा महाराष्ट्रातील हा एकमेव उत्सव म्हणता येईल. गणेशोत्सवाचे अनेक अर्थांनी महत्त्व आहेच. परंतु त्यात सहभागी होणाऱ्या लोकांची संख्या ही देशातील कोणत्याही सार्वजनिक उत्सवाचा विक्रम मागे टाकणारी ठरते. अन्य जे काही उत्सव होतात ते प्रामुख्याने पूर्णपणे धार्मिक किंवा आध्यात्मिक स्वरूपाचे असतात. त्या-त्या ठिकाणची मंदिरे त्यानिमित्ताने होणारे उत्सव, यात्रा, याकरिता देखील गर्दी होते. परंतु पूर्णपणे सार्वजनिक स्वरूप असूनही घराघरांतही तितक्याच श्रद्धेने साजरा होणारा गणेशोत्सव महाराष्ट्राचे खरोखरच भूषण

आणि वैभव ठरतो. या उत्सवाचे सामाजिक, सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊनच प्रत्येक व्यक्ती जितक्या निष्ठेने आणि भक्तीने सहभागी होते तितकेच सार्वजनिक स्वरूपात या उत्सवाची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्याकरिता खबरदारीही घ्यावी लागते. विशेषतः उत्सवाचे पावित्र्य, मांगल्य त्यातील भक्तीभावाला गालबोट न लागता सार्वजनिकदृष्ट्या या उत्सवाची प्रतिष्ठा जपण्याचा सर्वाधिक प्रयत्न होतो. या संपूर्ण दहा दिवसांमध्ये कुठेही अनुचित प्रकार घडू नयेत म्हणून सर्व प्रकारची खबरदारी घेतली जाते. उत्सव म्हणून लोकांमध्ये व्यक्त होणारा उत्साह आणि तितक्याच मोकळेपणाने उत्सव साजरे करण्याचे असलेले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा देखील प्रयत्न होतो. सामाजिकदृष्ट्या महाराष्ट्रासाठी असलेला हा नावलौकिक कायम ठेवण्याची जबाबदारी तशी सर्वांचीच असते. परंतु कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने सुरक्षा यंत्रणांवर त्या काळात सर्वाधिक ताण असतो हे नाकारता येणार नाही. अक्षरशः राज्यभरात कोट्यवधी घरांमध्ये गणरायांचे आगमन होते. छोट्या-मोठ्या स्वरूपात लाखाच्या आसपास सार्वजनिक गणेशोत्सव साजरे होतात. गेल्या महिनाभरापासून राज्यातील सगळ्या सुरक्षा यंत्रणा गणेशोत्सव आणि त्यानंतर येणाऱ्या सर्वच सण, उत्सवांच्या सुरक्षिततेची तयारी करत आहेत. या काळात इतर धर्मियांचेही काही सण येत असल्याने पोलिसांना अधिक काळजी घ्यावी लागते. सार्वजनिक उत्सवातील उत्साह आणि सुरक्षा यंत्रणांची कसोटी असे त्याचे स्वरूप ठळकपणाने लक्षात येते.

उत्सव कोणत्याही धर्माचा असो, ते जेव्हा सार्वजनिकरित्या व्यक्त होतात त्यावेळेला उत्सवांचे महत्त्व तर वाटतेच. परंतु ते साजरे करण्याची सामाजिक आणि कायदेशीर जबाबदारी देखील तितक्याच मोठ्या प्रमाणावर वाढत असते. अगदी मिरवणुका काढण्याच्या परवानगीपासून तर उत्सव जर सार्वजनिक ठिकाणी असेल तर त्यासाठी महापालिका किंवा संबंधित यंत्रणांची देखील परवानगी घ्यावी लागते. म्हणजे उत्सव सार्वजनिक असूनही सामाजिक हिताला बाधा येणार नाही. त्यासाठी काही नियमांची अंमलबजावणी केली जाते. परंतु अनेकवेळेला या उत्सवांचा उत्साह एवढा असतो की सगळ्याच नियमांची काटेकोर अंमलबजावणी होऊ शकत नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ज्या व्यापक प्रमाणात उत्सव साजरे होतात आणि त्यात सहभागी होणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेता सुरक्षा यंत्रणा पुरेशा ठरू शकत नाहीत. अशा वेळी लोकांकडून किंवा त्या-त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांकडून सहकार्याची अपेक्षा असते. तरी देखील या सगळ्या गर्दीचा गैरफायदा घेतला जाऊ शकतो. त्यातूनच काही अनुचित घटना घडण्याची शक्यता असते. मुंबई, पुण्यात गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच काही वादविवाद आणि अनुचित प्रकार घडले. म्हणजेच जाणीवपूर्वक सुरूवातीपासूनच तणाव निर्माण करण्याचा काही लोक प्रयत्न करतात. या प्रकारांचीच सुरक्षा यंत्रणांना देखील मोठी काळजी घ्यावी लागते. सध्या गणेशोत्सवात डीजे वाजवण्यावरून बरेच आरोप-प्रत्यारोप टीका-टिपण्णी होत आहे. हा नियम सगळ्याच धर्मांना लागू होऊ शकतो. कर्णकर्कश लाऊडस्पीकर्स किंवा डीजेसारखे प्रकार लावले जाऊ नयेत, अशी मागणी लोकांमधूनच झालेली आहे. आता प्रत्यक्ष उत्सवकाळामध्ये या मुद्यावरून कुठे काही गोंधळ गडबड होऊ नये यावर सुरक्षा यंत्रणांना लक्ष ठेवावे लागणार आहे. नागपूरमध्ये पोलीस आयुक्तांनी सरसकट १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत डीजे, डॉल्बी वापरण्यावर बंदी घातली आहे. परंतु या बंदीची अंमलबजावणी करणे हादेखील तितकाच महत्त्वाचा भाग ठरेल. स्वाभाविकपणे कायदा सुव्यवस्थेची अंमलबजावणी करताना पोलिसांना तारेवरचीच कसरत करावी लागते. उत्सव सार्वजनिक असल्याने गर्दीचे मानसशास्त्र लक्षात घेऊन सगळ्यांना शांत ठेवण्याचा प्रयत्न पोलिसांना करावा लागतो.

राज्यभरात कोणत्याही धर्माचा उत्सव असला तरी सुरक्षा यंत्रणांना चोवीस तास अलर्ट मोडवर राहावे लागते. सुरक्षा यंत्रणांना नियमित कामे करीत असताना या काळात अधिक कामाचा बोजा येतो. त्यात पुन्हा इतर संस्थांचे कार्यक्रम अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे, इतर राजकीय कार्यक्रम आणि विविध प्रश्नांवर ठिकठिकाणी होत असलेली आंदोलने, निदर्शने या सर्वांचाही अधिक भार पोलीस यंत्रणेवर येत असतो. गणेशोत्सवासारखा सर्वाधिक मोठा उत्सव आणि घराघरातले एक मांगल्यपूर्ण वातावरण लक्षात घेऊन आंदोलने, निदर्शने या प्रकारांना परवानगी मिळायला नको. मुंबईसारख्या गर्दीच्या महानगरात स्थानिक मुंबईकरांना आपल्या नोकरी व्यवसायात रोजगाराचा विचार करावा लागतो. त्यात या काळात होणारी गर्दी आणि इतर आंदोलने यातून मुंबईकरांची आणखीनच तारांबळ उडते. या सर्व सार्वजनिक उत्सवांबाबत एक महत्त्वाचे निरीक्षण असे नोंदवले जाते आहे, की बदलत्या काळाबरोबर लोकांचा उत्साह वाढतो आहे. परंतु सार्वजनिक हितासंबंधात तितकाच बेजबाबदारपणाही वाढताना दिसून येतो. मग अगदी सार्वजनिक स्वच्छतेपासून ते ध्वनिप्रदूषणापर्यंत अनेक गोष्टींसंदर्भात इतका बेजबाबदारपणा दिसून येतो. म्हणूनच सार्वजनिक उत्सव हे दिवसेंदिवस वाढत्या उत्साहाबरोबर सगळ्यांचीच कसोटी पाहणारे ठरू लागले आहेत. भविष्यकाळात सार्वजनिक उत्सव कसे साजरे करावेत, यासाठी व्यापक प्रबोधन करण्याची वेळ येणार आहे. वाढती लोकप्रियता म्हणजे वाढती बेशिस्त असे त्याचे स्वरूप होता कामा नये. दुर्दैवाने उत्सवातील वाढती गर्दी झुंडशाहीलाही आमंत्रण देणारी ठरली आहे.

# रस्त्यावर मोकाट जनावरे सोडल्यास दंडात्मक कारवाई

पान १ वरून

आपली जनावरे तातडीने सुरक्षित ठिकाणी बांधून ठेवावीत आणि त्यांची योग्य व्यवस्था करावी.

**मोकाट जनावरे पकडून गोशाळेत**

यापुढे रस्त्यावर मोकाट जनावरे आढळल्यास पालिकेच्या पथकाकडून ती पकडून नियमानुसार गोशाळेत जमा करण्यात येणार आहेत. तसेच संबंधित मालकांविरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल. कारवाईदरम्यान होणारा खर्चही संबंधित मालकाकडून वसूल केला जाणार असल्याचे पालिकेने पत्रकात स्पष्ट केले आहे.

# क्यूआर कोडविना विवाह दाखले; अमळनेरकरांची गैरसोय

## ऑनलाइन सुविधा सुरू करण्याची काँग्रेसची मागणी; निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील नागरिकांना विवाह नोंदणीचे ऑनलाइन व QR कोडयुक्त दाखले मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचा आरोप अमळनेर शहर काँग्रेस कमिटीने केला आहे. ही सुविधा तातडीने सुरू करावी, या मागणीचे निवेदन काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. मागणीची दखल न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. पूर्वी अमळनेर नगरपरिषदेमार्फत विवाह नोंदणीची ऑनलाइन प्रक्रिया सुरू होती. मात्र शासनाच्या आदेशानुसार काही महिन्यांपूर्वी विवाह नोंदणीचे काम नगरपरिषदेकडून ग्रामीण रुग्णालय प्रशासनाकडे वर्ग करण्यात आले. सध्या ग्रामीण रुग्णालयात ऑनलाइन विवाह नोंदणीची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना साधे छापील दाखले दिले जात असल्याचे काँग्रेसने निवेदनात म्हटले आहे.



**ग्रामपंचायतीत QR कोड, शहरात का नाही?**

ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींमध्ये QR कोडयुक्त ऑनलाइन विवाह नोंदणी दाखले उपलब्ध होत असताना अमळनेर शहरातील नागरिकांना अशा सुविधेपासून वंचित का ठेवले जात आहे, असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे. विविध शासकीय व खासगी संस्थांमध्ये कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ऑनलाइन व QR कोडयुक्त प्रमाणपत्रांना महत्त्व दिले जात असल्याने नागरिकांना अडचणी येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**जुनी ऑनलाइन प्रणाली हस्तांतरित करण्याची मागणी**

नगरपरिषदेकडे पूर्वीपासून उपलब्ध असलेली विवाह नोंदणीची ऑनलाइन सॉफ्टवेअर प्रणाली व QR कोडची सुविधा ग्रामीण रुग्णालयाकडे हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि ग्रामीण रुग्णालयाचे संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**निर्णय न झाल्यास आंदोलन**

विवाह नोंदणीसारख्या महत्त्वाच्या सेवेसाठी नागरिकांना वारंवार कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत. प्रशासनाने तातडीने ऑनलाइन व QR कोडयुक्त विवाह दाखल्यांची सुविधा सुरू करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. या मागणीवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा शहर काँग्रेस कमिटीने दिला आहे. निवेदन देताना शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, मनोज पाटील, पी. वाय. पाटील, विशाल पाटील, डॉ. रवींद्र पाटील, राजेंद्र पाटील, तेली भिकाजी पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाचपावली देवी मंदिर परिसरात चिखलाचे साम्राज्य

## गणेशमूर्ती, पूजा साहित्याच्या स्टॉलला अडथळा; भक्तांचीही मोठी गैरसोय



*अमळनेर : येथील पाचपावली देवी मंदिर परिसरात रस्त्याच्या दुरवस्थेमुळे निर्माण झालेले चिखलाचे साम्राज्य.*

**प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या परिसरात दरवर्षी मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली जातात, याची माहिती नगरपरिषद प्रशासनाला असतानाही वेळेत उपाययोजना न झाल्याने दुकानदार व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. उत्सव सुरू होण्यापूर्वी तातडीने चिखल हटवून खडी टाकावी, खड्डे बुजवून रस्ता समतल करावा आणि भाविकांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिक व व्यावसायिकांकडून होत आहे.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील पाचपावली देवी मंदिरासमोरील परिसरात चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याच परिसरात दरवर्षी गणेशमूर्ती विक्रीसह पूजासाहित्य, नारळ, मखर, विडा-पान, फुले आदींचे स्टॉल मोठ्या प्रमाणावर थाटले जातात. मात्र, रस्त्याची झालेली दुरवस्था यंदा दुकानदारांसह गणेशभक्तांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

शहरात सुमारे ४० दिवसांनंतर दमदार पावसाने हजेरी लावल्याने पाच पावली देवी मंदिरासमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल व खड्डे निर्माण झाले आहेत. गणेशमूर्ती विक्रीसाठी स्टॉल उभारणाऱ्या व्यावसायिकांना जागा तयार करताना अडचणी येत असून, पावसामुळे काही स्टॉल व साहित्याचेही नुकसान झाले आहे.

दरवर्षी गणेशोत्सवात या परिसरात मोठी गर्दी होत असते. गणेशमूर्ती खरेदीसाठी येणाऱ्या भाविकांना चिखलातून वाट काढावी लागत आहे. खड्ड्यांमुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची विशेष गैरसोय होत असून, चिखलामुळे गणेशमूर्तींचे नुकसान होण्याची शक्यताही व्यक्त होत आहे.

## शंकराचार्यांकडून स्थापित गणेशमूर्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



प्रत्यक्ष शंकराचार्य यांनी स्थापन केलेली एक गणेशमूर्ती पुण्यात आहे. ही स्थापनेची घटना पूर्वनियोजित नव्हती, तर अचानक घडून आली. हे भाग्य वाट्याला आलेले गणेश मंडळ म्हणजे कसबा पेठेतील नवग्रह मित्रमंडळ. शनिवारवाड्याच्या उजव्या बाजूस पहिला मान असलेल्या कसबा गणपतीनजीकच या मंडळातर्फे गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना केली जाते. या मूर्तीच्या स्थापनेविषयी इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे म्हणतात, की १९८७-८८ च्या सुमारास मंडळाने गोसावी या प्रख्यात मूर्तीकारांकडून नवीन मूर्ती घडवून घेतली. फाल्गुनअखेरीस मूर्ती तयार झाली होती. त्यामुळे गुढीपाडव्यास या मूर्तीची प्रतिष्ठापना व गणेशयाग करण्याचे निश्चित झाले. त्यावेळी कांची कामकोटी पीठाचे ६९ वे पीठाधीश श्री जयेंद्र सरस्वती हे पुण्यात होते. तेव्हा बलकवडे व मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सारसबागेजवळील त्यांच्या मठात त्यांची भेट घेऊन येण्याची विनंती केली. शंकराचार्यांनी ती तत्काळ मान्य केली. पाडव्याचा दिवस उजाडला. जे याग व प्रतिष्ठापना करणारे पुरोहित होते ते काही अडचणींमुळे आलेच नाहीत. त्यामुळे मंडळासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला. मंडळाचे अध्यक्ष मानसिंग पाटोळे व त्यावेळेस सचिव असलेले बलकवडे यांनी ही गोष्ट शंकराचार्यांकडे जाऊन सांगितली. तेव्हा शंकराचार्यांनी तत्काळ स्वतःकडे बोट दाखवले आणि म्हटले, की हा पुरोहित तुम्हाला चालेल का? व मठाच्या ११ वैदिकांसह ते कसबा पेठेत आले आणि त्यांनी गणेश याग व मूर्तीची प्रतिष्ठापना रस्त्यावर बसून स्वतः पार पडली. आदी शंकराचार्यांनी द्वारका, पुरी, ज्योतिर्मठ, शृंगेरी येथे चार पीठे स्थापन केली. त्यांनी स्थापन केलेले पाचवे पीठ म्हणजे कांची कामकोटी. तेथे स्वतः आदी शंकराचार्य राहत आणि ते येथील पहिले मठाधीश.

या परंपरेतील शंकराचार्यांनी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करणे हे महत्‌भाग्य नवग्रह मित्रमंडळाच्या वाट्यास आले. तेही पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर. हा मोठा योगच!

# आज एक लाखाचे सोने घेतल्यास २०५० मध्ये त्याचे किती होतील?

## आकडा अतिशय धक्कादायक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही वर्षांतील सोन्याच्या दरवाढीचा कल पाहता यापुढच्या काळातही सोन्याचे भाव वाढतच राहतील, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. २०५० पर्यंत सोन्याचे भाव नेमके किती असतील, याबद्दल सामान्य गुंतवणूकदारामध्ये देखील उत्सुकता आहे. भारतात सोने हा केवळ हौसेने घेतलेला दागिना नाही तर दीर्घकाळ गुंतवणुकीचा उत्तम पर्याय आहे. महागाई, आर्थिक अनिश्चितता आणि भू-राजकीय तणावामुळे सोन्यात गुंतवणूक करण्याचे प्रमाण वाढते आणि सोन्याला सहसा मोठा भाव मिळतो.

जानेवारी २०२६ मध्ये १० ग्रॅमच्या २४ कॅरेटचे सोने भारतात किंमत एक लाख ४२ हजार ५४० किंवा १४,२५४ दर ग्रॅम आहे. तसेच २२ कॅरेट सोन्याचे दर ग्रॅमची किंमत एक लाख ३० हजार ६६० रुपये किंवा १३,०६६ रुपये दर ग्रॅम आहे. गेल्या २६ वर्षांत २४ कॅरेट शुद्धतेचे सोने जवळपास तिप्पट महाग झाले आहे. २०२० मध्ये ५० हजार भाव असलेले सोने आता सुमारे एक लाख ४२ हजार ५४० रुपये इतके झाले आहे.

गेल्या ३० वर्षांचा डेटा पाहिला तर भारतात सोन्याचा चक्रवाढ वार्षिक वृद्धी दर १०.८३ टक्के वार्षिक होता.



गेल्या २० वर्षांत १४.३५ टक्के यात वाढ झाली आहे. गेल्या १५ वर्षांत रुपयाचे अवमूल्यन आणि मंदी असताना सरासरी परतावा सुमारे १२ टक्के वाढला आहे. युएसडी टर्मनुसार सोने ५-७ टक्के वार्षिक वाढ झाली आहे.

चीन, रशिया आणि भारत सारख्या देशांच्या मध्यवर्ती बँकांकडून होणारी मोठी खरेदी यांसारखे अनेक घटक भविष्यातील सोन्याच्या किमतींवर परिणाम करतील अशी अपेक्षा आहे. जागतिक महागाई, डॉलरचे कमकुवत होणे, भौगोलिक ताण- तणाव तसेच तंत्रज्ञान आणि हरित ऊर्जा क्षेत्रातील वाढती मागणी हे घटकही यात महत्त्वाची भूमिका बजावतील. २०३० पर्यंत सोन्याचा भाव प्रति औंस ५,००० ते १०,००० डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो आणि २०४०-२०५० च्या दिशेने त्यात वाढ होत राहू शकते.

जर आज तुम्ही एक लाख रुपये गुंतवूणक जर २४ कॅरेट सोने विकत घेतले तर त्यात ७.०१६ ग्रॅम सोने मिळेल. १० टक्के १० टक्के चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने या गुंतवणुकीचे मूल्य २०५० पर्यंत वाढून अंदाजे ९.८५ लाख रुपये होऊ शकते. किंवा ११-१२ टक्के चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने ते १२-१५ लाख रुपयांपर्यंतही पोहोचू शकते. या उलट एक लाख रुपये तुम्ही मुदत ठेवीत मूल्य त्याच कालावधीत वाढून ४.१७ ते ५.२९ लाख रुपये होऊ शकते.

# शिवटेकडीवर १००८ रोपांना जगविण्यासाठी पाइपलाइनचे काम सुरू

## बल्ल्या मारुती तलावापासून थेट टेकडीपर्यंत जलवाहिनी; वृक्षसंवर्धनासाठी मावळ्यांचा लोकसहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धार येथील शिवटेकडीवर १००८ रोपांचे वृक्षारोपण केल्यानंतर आता त्यांच्या संगोपनासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. बल्ल्या मारुती तलावाच्या काठापासून शिवटेकडीपर्यंत पाइपलाइन टाकण्याच्या कामाला सुरूवात झाली आहे. जेसीबीच्या सहाय्याने पाइपलाइनसाठी चारी खोदण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

शिवटेकडीच्या पर्यावरणप्रेमींच्या हस्ते विधीवत पूजन करून या कामाचा प्रारंभ करण्यात आला.



*अमळनेर : तालुक्यातील धार येथील शिवटेकडीवर विधीवत पूजनासह श्रीफळ वाढवून पाईपलाईनच्या कामाला सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित पर्यावरणप्रेमी.*

वृक्षारोपणानंतर पावसाने दडी मारल्याने नव्याने लावलेल्या रोपांना पाणी देण्यासाठी मावळ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. टेकडीवर टँकरद्वारे पाणी पोहोचविण्यासाठी दोन ट्रॅक्टरचा वापर करावा लागत असून, रोपे जगविण्यासाठी पर्यावरणप्रेमी व मावळे सातत्याने श्रम घेत आहेत.

**वृक्षारोपणापेक्षा संवर्धनावर भर**

दररोज टँकरद्वारे पाणी नेण्याची अडचण दूर करण्यासोबतच भविष्यात दरवर्षी हजारो रोपांना नियमित पाणी मिळावे, या उद्देशाने कायमस्वरूपी पाइपलाइन उभारण्यात येत आहे. या जलवाहिनीमुळे शिव टेकडीवरील रोपांना वर्षभर पाणी उपलब्ध करून देण्यास मोठी मदत होणार आहे.

'झाडे लावणे ही सुरूवात; ती जगविणे ही खरी सेवा' या भूमिकेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. १००८ रोपे लावून थांबण्याऐवजी ती मोठी होईपर्यंत त्यांची निगा राखण्याचा संकल्प शिव टेकडीच्या मावळ्यांनी केला आहे.

या उपक्रमासाठी पर्यावरणप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि दाते आर्थिक मदतीसोबतच श्रमदानातूनही सहभागी होत आहेत. पाइप, फिटिंग, पंप, टाकी, वाहतूक तसेच अन्य खर्चासाठी आणखी मदतीची गरज आहे. नागरिकांनी या पर्यावरण उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'आजची छोटी मदत उद्याच्या हजारो झाडांना जीवन देऊ शकते,' असा संदेश देत शिवटेकडीवरील १००८ रोपे जगवून पुढील पिढ्यांसाठी 'मानवनिर्मित जंगल' उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# हरितालिका व श्रीगणेश चतुर्थी विशेष

# हरितालिका व्रत का करतात? काय आहे त्याचे महत्त्व?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हरितालिका व्रत हे भगवान शंकर आणि माता पार्वती यांना समर्पित एक पवित्र व्रत आहे. हे व्रत प्रामुख्याने विवाहिता आपल्या पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी करतात. तसेच अविवाहित मुली मनासारखा, सद्गुणी जीवनसाथी मिळावा, या श्रद्धेने हे व्रत करतात.

**हरितालिका व्रत का करावे?**

धार्मिक मान्यतेनुसार माता पार्वती यांनी भगवान शंकर यांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या दृढ भक्ती, श्रद्धा आणि संकल्पाचे स्मरण म्हणून हरितालिका व्रत केले जाते.

**या व्रतामागील प्रमुख भावना**

- पतीचे दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य लाभावे.
- पती-पत्नीमध्ये प्रेम, विश्वास आणि सौख्य कायम राहावे.
- कुटुंबात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी.
- अविवाहित मुलींना योग्य व सद्गुणी जीवनसाथी मिळावा.
- मनोकामना पूर्ण व्हाव्यात आणि जीवनात मंगलमयता यावी.
- माता पार्वतींच्या भक्ती, संयम आणि दृढ निश्चयातून प्रेरणा मिळावी.

**हरितालिका व्रताचे महत्त्व**

हरितालिका व्रत हे केवळ उपवास नसून श्रद्धा, भक्ती, संयम, निष्ठा आणि समर्पणाचे प्रतीक मानले जाते. भगवान शंकर आणि माता पार्वती हे आदर्श दाम्पत्य मानले जातात. त्यांच्या पूजनातून वैवाहिक जीवनातील प्रेम, परस्पर विश्वास, समर्पण आणि नात्यांची पवित्रता यांचे स्मरण केले जाते. या दिवशी महिला शंकर-पार्वती यांची पूजा करून आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि मंगलमय जीवनासाठी प्रार्थना करतात.

**हरितालिका व्रत कसे करावे?**

**१) सकाळी स्नान व संकल्प**



सकाळी लवकर उठून स्नान करावे. स्वच्छ वस्त्रे परिधान करून पूजा स्थळ स्वच्छ करावे. भगवान शंकर आणि माता पार्वती यांचे स्मरण करून व्रताचा संकल्प करावा.

**२) शंकर-पार्वती यांची स्थापना**

पाटावर स्वच्छ वस्त्र अंथरून भगवान शंकर आणि माता पार्वती यांची मूर्ती किंवा प्रतिमा ठेवावी. परंपरेनुसार मातीच्या मूर्ती करून त्यांची पूजा करण्याची पद्धतही आहे.

**३) पूजेची तयारी**

पूजेसाठी फुले, हार, बेलपत्र, अक्षता, हळद, कुंकू, धूप, दीप, फळे, नैवेद्य आणि इतर पूजासाहित्य तयार ठेवावे.

**४) शंकर-पार्वतींचे पूजन**

प्रथम श्रीगणेशांचे पूजन करावे. त्यानंतर भगवान शंकर आणि माता पार्वती यांची श्रद्धेने पूजा करावी. शंकरजींना बेलपत्र व फुले अर्पण करावीत. माता पार्वतींना हळद, कुंकू, फुले आणि सौभाग्याच्या वस्तू अर्पण कराव्यात.

**५) हरितालिका व्रत कथा**

पूजेनंतर श्रद्धेने हरितालिका व्रताची कथा वाचावी किंवा ऐकावी. माता पार्वतींच्या तपश्चर्येचे आणि भगवान शकरांच्या प्राप्तीचे स्मरण करावे.

**६) आरती व प्रार्थना**

भगवान शंकर-पार्वती यांची आरती करून आपल्या कुटुंबाच्या सुख-शांतीसाठी, पतीच्या उत्तम आरोग्यासाठी आणि वैवाहिक जीवनातील प्रेम व सौख्यासाठी प्रार्थना करावी.

**७) उपवास**

परंपरेनुसार काही महिला या दिवशी निर्जल उपवास करतात, तर काही फलाहार करतात. निर्जल उपवास करणे प्रत्येकासाठी आवश्यक नाही. आपल्या प्रकृतीनुसार आणि कुटुंबाच्या परंपरेनुसार व्रत करावे.

**८) दुसऱ्या दिवशी पारण**

परंपरेनुसार दुसऱ्या दिवशी पुन्हा पूजा करून नैवेद्य दाखवावा आणि त्यानंतर योग्य पद्धतीने व्रत सोडावे.

**व्रताचा खरा संदेश**

हरितालिका व्रत आपल्याला श्रद्धा, संयम, निष्ठा, प्रेम आणि दृढ संकल्प यांचे महत्त्व शिकवते. माता पार्वतींच्या भक्ती आणि तपश्चर्येतून प्रेरणा घेऊन जीवनात चांगले विचार, सकारात्मकता आणि भक्ती जोपासणे हाच या व्रताचा सुंदर संदेश आहे.

# मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्यापैकी ४ राशींचे नशीब फळफळले!

## गणेशोत्सवाचे १२ दिवस; पैसा, नोकरी, प्रेमात मोठे बदल..

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रानुसार दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ गणेशोत्सवाचा हा काळ १२ राशींसाठी काय बदल घेऊन येणार? पैसा, नोकरी, प्रेम जीवनात काय बदल होणार? मेष ते कन्याचे राशीभविष्य.

यंदा गणेशोत्सव दि. १४ ते २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत असणार आहे. ज्योतिषशास्त्रानुसार हा १२ दिवसांचा काळ अनेकांचे नशीब पालटणारा ठरणार आहे. ग्रह-नक्षत्रांच्या हालचालींमुळे काही राशींसाठी हा आठवडा भाग्याचा ठरेल, तर काहींना आव्हानात्मक ठरेल. त्यामुळे हा काळ कोणत्या राशींसाठी कशाप्रकारे बदल घेऊन येतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. बऱ्याच ज्योतिषप्रेमींना उत्सुकता आहे, की गणेशोत्सवाचे १२ दिवस कसे जाणार? आज आपण मेष ते कन्या अशा सहा राशींचे राशीभविष्य जाणून घेऊया.

**मेष :** या राशीच्या व्यक्तींना गणेशोत्सवाचा हा काळ उत्साहवर्धक आणि सकारात्मक राहण्याची शक्यता आहे. रखडलेली कामे मार्गी लागतील आणि नवीन संधी समोर येऊ शकतात. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. आर्थिक बाबतीत मोठे निर्णय घेताना घाई टाळणे योग्य ठरेल. गणपती बाप्पांची भक्ती केल्याने मनःशांती आणि आत्मविश्वास वाढेल.

**वृषभ :** या राशीसाठी यंदाचा गणेशोत्सव स्थिरता आणि समाधानाचा अनुभव येऊ शकतो. घरातील एखादी महत्त्वाची जबाबदारी पूर्ण होईल. नोकरी किंवा व्यवसायात तुमच्या प्रयत्नांचे कौतुक होण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती सुधारण्याचे संकेत आहेत, मात्र अनावश्यक खर्च टाळावा. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कुटुंबासोबत घालवलेला वेळ विशेष आनंद देईल

**मिथुन :** या राशीसाठी हा गणेशोत्सव नवीन विचार आणि नवीन सुरूवातीचा ठरू शकतो. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट भविष्यात उपयोगी ठरू शकते. कामाच्या ठिकाणी संवाद साधताना संयम ठेवणे आवश्यक आहे. पैशांच्या बाबतीत परिस्थिती चांगली राहील, पण अचानक खर्च होण्याची शक्यता आहे. गणपती बाप्पांच्या कृपेने मनातील एखादी इच्छा पूर्ण होण्याचे संकेत मिळू शकतात.

**कर्क :** या राशीच्या व्यक्तींसाठी हा गणेशोत्सव कौटुंबिक सुख आणि मानसिक समाधान मिळेल.



घरातील वातावरण प्रसन्न राहील आणि जवळच्या व्यक्तींकडून चांगली बातमी मिळू शकते. कामाच्या ठिकाणी जबाबदारी वाढेल, परंतु त्यातून प्रतिष्ठाही मिळेल. आर्थिक व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी. गणेशोत्सवात केलेली मनापासूनची प्रार्थना तुम्हाला सकारात्मक ऊर्जा देईल.

**सिंह :** या राशीसाठी गणेशोत्सव आत्मविश्वास वाढवणारा ठरू शकतो. तुमच्या नेतृत्वगुणांचा उपयोग करून एखादे महत्त्वाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करता येईल. व्यवसायात नवीन संपर्क निर्माण होतील. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांकडून चांगला प्रतिसाद मिळू शकतो. घरातील एखादा गैरसमज दूर होईल. गणपती बाप्पांच्या आशीर्वादाने नवीन मार्ग खुले होतील.

**कन्या :** या राशीसाठी गणेशोत्सवाचा काळ चांगले यश मिळेल. मागील काही दिवसांपासून सुरू असलेली चिंता कमी होईल. आर्थिक बाबतीत सावधपणे निर्णय घेतल्यास फायदा होईल. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला तुमच्या मदतीची गरज भासू शकते. गणेशोत्सवातील धार्मिक वातावरण मनाला शांतता आणि सकारात्मकता देईल.

## ‘मोदक कथा’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मोदक कथेत श्रीगणेशांच्या तीक्ष्ण बुद्धिमतेचे दर्शन होते. सर्व देवांनी मिळून अमृताचा मोदक बनवून माता पार्वतींना दिला. गणेश व स्कंद यांनी तो आपल्याला द्यावा, अशी विनंती केली. माता पार्वतींनी त्यांना अट घातली, की जो पृथ्वी प्रदक्षिणा करून आधी येईल त्याला मोदक मिळेल. स्कंद तत्काळ निघाला. गणपतींनी भगवान शंकर व माता पार्वतींना आसनावर बसविले, यथाविधी पूजन केले आणि त्यांना प्रदक्षिणा घातली आणि म्हणाले की जप, तप, यज्ञ तीर्थाटन सर्व प्रकारच्या साधना, पृथ्वी प्रदक्षिणा या सर्वांचे पुण्य फळ आई-वडिलांच्या पूजेच्या सोळाव्या भागाएवढेही होत नाही. अर्थात गणपतीलाच तो मोदक मिळाला. यात कार्यशक्तीने विजय प्राप्तीसाठी आवश्यक असलेली तत्परता स्कंदाने दाखविली. त्याच्या ठिकाणी त्याचे महत्त्व निश्चित आहे. पण बुद्धिचातुर्यानेही कार्यसिद्धी कशी होऊ शकते, हेही दिग्दर्शित केले आहे. त्याचबरोबर विविध शास्त्रार्थांचा समन्वय साधून लक्ष्य गाठणे सहज शक्य आहे. हेही दाखवून दिले, याशिवाय कोणत्याही काळात मातृ-पितृ भक्ती हीच सर्वश्रेष्ठ पूजा असल्याचेही जगापुढे आदर्श मांडले अशा श्रीगणेशांचे बाह्योपचाराने पूजन आणि लोकाचाराचे उत्सव साजरे करण्यात धन्यता न मानता गणेश चरित्र आत्मसात करून स्वतःचा गुणात्मक विकास साधने हिताचे ठरेल.

# गणपती बाप्पांबद्दलची संपूर्ण महत्त्वपूर्ण माहिती!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती हे प्रथम पूजेचे देवता. कोणत्याही शुभ कार्याची सुरूवात गणेश पूजनानेच होते. ते पार्वती-शंकरांचे पुत्र आणि बुद्धी, समृद्धीचे दाता मानले जातात.



**त्यांची प्रसिद्ध आख्यायिका**

माता पार्वती यांनी आपल्या अंगाच्या मळापासून श्रीगणेशांची निर्मिती केली. भगवान शंकरांनी रागात त्यांचे मस्तक छेदले, मग हत्तीचे मस्तक लावून त्यांना पुनर्जीवन दिले आणि ‘प्रथम पूज्य’ होण्याचा वर दिला.

**गणपतींची शिकवण**

अडचणींना घाबरू नका. बुद्धी आणि धैर्याने प्रत्येक विघ्न दूर होते.

**गणपतींची खास वैशिष्ट्ये**

**हत्तीचे मस्तक :** विशाल बुद्धीचे प्रतीक
**उंदीर हे वाहन :** इच्छांवर नियंत्रणाचे प्रतीक
**मोदक प्रिय :** ज्ञानाच्या गोडव्याचे प्रतीक
**एकदंत :** एकाग्रतेचे प्रतीक

**गणेशोत्सव :** भाद्रपद महिन्यात १० दिवसांचा उत्सव आणि एक विशेष गोष्ट महाराष्ट्रात गणेशोत्सव हा लोकमान्य टिळकांमुळे सार्वजनिक उत्सव झाला.
प्रमुख गणपती मंदिरे :
सिद्धिविनायक (मुंबई),
अष्टविनायक : महाराष्ट्रातील ८ जागृत स्थाने. दगडूशेठ हलवाई (पुणे).

**आज एक प्रार्थना करूया**

“हे गणराया, आमच्या जीवनातील सर्व विघ्ने दूर कर आणि सुख-समृद्धी दे.”

**गणपती बाप्पा मोरया!**
**मंगलमूर्ती मोरया!**
**पुढच्या वर्षी लवकर या!**

# बाप्पा चाहूल तुमच्या आगमनाची...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घराच्या अंगणात अजून मखर उभे राहायचे आहे. दारावर तोरण बांधायचे आहे. पूजेच्या ताटात दुर्वा-मोदक सजायचे आहेत. तरीही मनाला तुमच्या आगमनाची चाहूल लागली आहे.

हे गणराया, तुम्ही येण्यापूर्वीच वातावरणात एक विलक्षण प्रसन्नता पसरते. मातीला सुगंध येतो, फुलांना बहर येतो, ढोल-ताशांचा नाद अंतर्मनात ऐकू येतो आणि ओठांवर आपोआप शब्द उमटतात ‘गणपती बाप्पा मोरया!’

मातीमध्ये दडलेले तुमचे रूप

तुमच्या आगमनाची सुरूवात बाजारातील सजावटीतून होत नाही. ती होते भूमातेच्या पवित्र मातीपासून. निराकार असलेली माती भक्ताच्या हातांचा स्पर्श स्वीकारते आणि हळूहळू तुमचे मंगलमय रूप धारण करते. त्या मातीला आकार देणारे हात मनात सतत तुमचे नामस्मरण करतात. प्रथम आसन, नंतर लंबोदर, विशाल मस्तक, मोठे कान, सूक्ष्म नेत्र आणि वक्रतुंड साकार होते. निर्जीव वाटणाऱ्या मातीमध्ये भक्तीचा स्पर्श होताच ती केवळ मूर्ती राहत नाही; ती आपल्या श्रद्धेचे जीवंत प्रतीक बनते.

तुम्ही जणू सांगतात-
“तुम्हीही मातीचेच आहात; पण योग्य संस्कार, शुद्ध विचार आणि भक्तीने तुमच्या जीवनालाही सुंदर आकार देता येतो.”

तुमच्या आगमनापूर्वी घर नव्हे, मन स्वच्छ करायला हवे

गणेशोत्सव जवळ आला की आपण घर झाडतो, भिंती रंगवतो, मखर सजवतो आणि दिव्यांची रोषणाई करतो. परंतु तुमच्या स्वागताची खरी तयारी तेव्हा सुरू होते जेव्हा आपण आपल्या मनातील राग, मत्सर, लोभ, अहंकार आणि कटुता स्वच्छ करू लागतो.

घराच्या दाराला बांधलेले तोरण मंगलतेचे प्रतीक आहे; पण मनाच्या दारावर नम्रतेचे तोरण बांधले तरच तुमचे खरे स्वागत होते. मखरामध्ये प्रकाश असावा; त्याहून अधिक आपल्या विचारांमध्ये प्रकाश असावा. पूजेच्या ताटात फुले असावीत; त्याहून अधिक आपल्या वाणीमध्ये गोडवा असावा.

अहो बाप्पा, तुम्ही स्वच्छ घरापेक्षा निर्मळ अंतःकरणात अधिक आनंदाने विराजमान होतात.

**तुमचे विशाल मस्तक काय सांगते?**

तुमचे विशाल मस्तक व्यापक आणि सकारात्मक विचार करण्याची प्रेरणा देते. जीवनातील प्रत्येक घटना केवळ आपल्या दृष्टीने न पाहता तिचा सर्व बाजूंनी विचार करावा, हा तुमचा संदेश आहे. तुमचे लहान डोळे एकाग्रता शिकवितात. ध्येयाकडे पाहताना मन विचलित होऊ देऊ नये. तुमचे मोठे कान सांगतात, की बोलण्यापेक्षा अधिक ऐकावे. सत्य समजून घेण्यापूर्वी निष्कर्ष काढू नयेत. तुमचे विशाल उदर जीवनातील चांगले-वाईट अनुभव संयमाने पचविण्याची शक्ती शिकविते. तुमची वक्र सोंड परिस्थितीनुसार नम्र किंवा सामर्थ्यवान होण्याची बुद्धी देते. तुमच्या हातातील पाश मनातील वासनांवर नियंत्रण ठेवण्याचा, तर अंकुश भरकटलेल्या मनाला योग्य मार्गावर आणण्याचा संदेश देतो. तुमच्या चरणाजवळील मूषक मानवी इच्छा आणि अस्थिर मनाचे प्रतीक आहे. तुम्ही त्यावर आरूढ आहात. कारण विवेक जागृत झाला की मनातील इच्छा आपल्या नियंत्रणात येतात.

**दुर्वेतील साधेपणा आणि मोदकातील गोडवा**

तुम्हाला सुवर्णालंकारांपेक्षा साधी हिरवी दुर्वा प्रिय आहे. कारण भक्तीचे मूल्य वस्तूच्या किमतीवर ठरत नाही; ते अर्पण करणाऱ्याच्या भावनेवर ठरते. दुर्वा कितीही वेळा तुडविली तरी पुन्हा उगवते. संकटांनी खचून न जाता पुन्हा उभे राहण्याची जिद्द ती शिकविते. तुमच्या हातातील मोदक बाहेरून साधा असतो; पण त्याच्या अंतरंगात गोड सारण असते. त्याप्रमाणे ज्ञान आणि साधनेचे बाह्य स्वरूप कधी कठीण वाटले, तरी त्यातून मिळणारा आत्मानंद अत्यंत मधुर असतो.

**तुमच्या आगमनाची खरी चाहूल**



ढोलाचा पहिला ठेका कानावर पडणे म्हणजेच तुमच्या आगमनाची चाहूल नाही. घरातील दुरावलेली माणसे पुन्हा एकत्र येऊ लागली, तर ती तुमच्या आगमनाची चाहूल आहे. मनातील कटुता विरघळू लागली, अहंकार नम्र झाला आणि चुकीबद्दल क्षमा मागण्याचे धैर्य निर्माण झाले, तर ती तुमच्या आगमनाची चाहूल आहे. गरजू व्यक्तीला मदतीचा हात मिळाला, भुकेल्याला अन्न मिळाले, निराश व्यक्तीच्या चेहऱ्यावर आशेचे हास्य फुलले आणि कुटुंबामध्ये संवाद सुरू झाला तेव्हा खऱ्या अर्थाने गणरायांचे आगमन झाले, असे समजावे.

**तुम्ही विघ्ने संपवत नाहीत; त्यांच्याशी लढण्याची बुद्धी देतात**

आम्ही तुम्हाला विघ्नहर्ता म्हणतो. त्याचा अर्थ जीवनामध्ये कधीही संकट येणार नाही, असा नाही. तुम्ही संकट ओळखण्याची दृष्टी, त्याचा सामना करण्याचे धैर्य आणि योग्य निर्णय घेण्याची सद्बुद्धी देतात. कधी विघ्न दूर करणे आवश्यक असते, तर कधी तेच विघ्न आपली दिशा चुकीची असल्याचा संकेत असते. कोणत्या संकटाशी लढायचे, कोणत्या प्रसंगी थांबायचे आणि कधी मार्ग बदलायचाहा विवेक तुमच्या कृपेने प्राप्त होतो. म्हणूनच तुमच्याकडे प्रार्थना करताना केवळ ‘माझी सर्व संकटे दूर करा’ असे न म्हणता ‘संकटांचा सामना करण्याचे सामर्थ्य आणि योग्य निर्णय घेण्याची बुद्धी द्या,’ अशी प्रार्थना करणे अधिक अर्थपूर्ण ठरते.

**तुमचे आगमन म्हणजे कुटुंबाचे पुनर्मीलन**

गणेशोत्सवात घरातील प्रत्येक व्यक्तीला काही ना काही जबाबदारी मिळते. कोणी मखर सजवते, कोणी फुले आणते, कोणी मोदक करते, कोणी आरती म्हणते, तर लहान मुले आनंदाने दुर्वा मोजतात. या सर्व कृतींमधून केवळ पूजा होत नाही; कुटुंबातील नाती पुन्हा जुळतात. एकत्रित श्रम, सामूहिक प्रार्थना आणि प्रसादाचे वाटप यातून घरातील प्रेम दृढ होते. तुमच्या मूर्तीसमोर श्रीमंत-गरीब, मोठा-लहान आणि ज्ञानी-अज्ञानी असा कोणताही भेद राहत नाही. सर्वजण एकाच स्वरात म्हणतात, ‘गणपती बाप्पा मोरया!’

**मातीचा गणपती बाप्पा आणि पर्यावरणाचा संदेश**

हे भूमिपुत्रा, तुमची मूर्ती मातीतून जन्मते आणि पुन्हा मातीतच विलीन होते. त्यामुळे तुमचा उत्सव निसर्गाला हानी पोहोचविणारा कसा असू शकेल? शाडू किंवा नैसर्गिक मातीची मूर्ती, साधी सजावट, निर्माल्याचे सेंद्रिय खत आणि ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सव हीच आजच्या काळातील खरी गणेशभक्ती आहे. तलाव, नदी आणि विहिरी प्रदूषित करून आम्ही गणरायांची सेवा करू शकत नाही. निसर्गाचे संरक्षण करणे म्हणजेच गणेशतत्त्वाचा सन्मान करणे होय.

**आगमन आणि विसर्जन यामधील आध्यात्मिक रहस्य**

तुम्ही येतात तेव्हा आम्ही आनंदाने तुमचे स्वागत करतो. काही दिवस तुमची मनोभावे सेवा करतो; पण विसर्जनाची वेळ जवळ आली की डोळे पाणावतात. मात्र, तुमचे विसर्जन म्हणजे तुमचा अंत नाही. मूर्तीचे रूप पाण्यात विरघळते; पण तुमच्या आगमनाने मनात जागविलेली श्रद्धा, सद्बुद्धी आणि प्रसन्नता कायम राहते. तुम्ही आपल्याला अनासक्ती शिकवितोस. ज्याचे प्रेमाने स्वागत केले, त्याला योग्य वेळी तितक्याच प्रेमाने निरोप देणे हेच जीवनाचे सत्य आहे. रूप बदलते; तत्त्व नष्ट होत नाही. माती पाण्यात मिसळते, पाणी पृथ्वीमध्ये जाते आणि त्याच पृथ्वीतून पुढच्या वर्षी पुन्हा तुमचे रूप साकारते.

अहो बाप्पा यावेळीही आमच्यात बदल घडवा

हे गणराया, यावर्षी तुम्ही केवळ आमच्या मखरामध्ये विराजमान होऊ नका; आमच्या विचारांमध्येही विराजमान व्हा. आमच्या बुद्धीतील संभ्रम दूर करा. वाणीतील कटुता नाहीशी करा. नात्यांमधील दुरावा संपवा. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य द्या आणि योग्य निर्णय घेण्याचा विवेक प्रदान करा. आम्हाला मोठ्या कानांनी दुसऱ्याचे दुःख ऐकायला शिकवा. सूक्ष्म नेत्रांनी सत्य ओळखायला शिकवा. विशाल उदराप्रमाणे जीवनातील कटू अनुभव पचवायला शिकवा आणि मूषकावर नियंत्रण ठेवणाऱ्या तुमच्या रूपाप्रमाणे मनातील वासनांवर विजय मिळविण्याची शक्ती द्या. आज वातावरणातील प्रत्येक सुगंध, प्रत्येक मंगलध्वनी आणि हृदयातील प्रत्येक स्पंदन जणू एकच संदेश देत आहे-
मखर अजून सजायचे आहे,
दुर्वा अजून यायच्या आहेत;
मोदकांचा सुगंध दरवळायचा आहे, तरी मनाच्या दाराशी चाहूल लागली आहे
गणराया, तुमच्या आगमनाची! अहो बाप्पा, आमच्या घरात आनंद घेऊन या, मनात सद्बुद्धी जागवा, नात्यांत प्रेम निर्माण करा आणि जीवनातील प्रत्येक विघ्नावर मात करण्याचे सामर्थ्य द्या!

**गणपती बाप्पा मोरया!**
**मंगलमूर्ती मोरया!**




# घरगुती गणपती स्थापना : सोपी व शास्त्रोक्त पूजा पद्धती आणि महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा केला जाणारा सण आहे. "श्री गणेशाय नमः" च्या गजरात विघ्नहर्त्या मंगलमूर्तीचे आपल्या घरी आगमन होते. घरगुती गणपतीची स्थापना शास्त्रोक्त पद्धतीने आणि सोप्या रीतीने कशी करावी, यासाठीची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

### १. पूजेसाठी लागणारे साहित्य

**गणपतीसाठी :** श्री गणेशाची मूर्ती, पाट/चौरंग, लाल/पिवळे वस्त्र, तांदूळ/अक्षता, हळद, कुंकू, चंदन, गंध, दुर्वा, लाल/पिवळी फुले, हार, शमीपत्र/बेलपत्र (परंपरेनुसार), धूप, अगरबत्ती, कापूर, समई/दिवा, तेल किंवा तूप आणि पंचामृत.

**कलशासाठी :** तांब्या/कलश, पाणी, सुपारी, नाणे, अक्षता, हळद-कुंकू, आंब्याची पाने, नारळ, लाल/पिवळे वस्त्र.

**नैवेद्यासाठी :** मोदक, फळे, दूध, साखरेचा किंवा गुळाचा नैवेद्य, खोबरे, पंचखाद्य (किंवा घरातील सात्विक नैवेद्य).

### २. स्थापनेपूर्वी करायची तयारी

१. पूजेची जागा स्वच्छ करून तेथे पाट किंवा चौरंग ठेवा.
२. पाटावर रांगोळी काढा आणि त्यावर लाल किंवा पिवळे वस्त्र अंथरा.
३. गणपतीची मूर्ती शक्यतो पूर्व किंवा उत्तर दिशेकडे तोंड करून ठेवा.
४. समई किंवा दिवा प्रज्वलित करा आणि मन शांत करून भक्तीभावाने पूजेला सुरुवात करा.

टीपः भक्ती, श्रद्धा आणि शुद्ध अंतःकरण हाच खऱ्या पूजेचा पाया आहे.

### ३. पूजा विधी (१५ सोपे टप्पे)

**आवाहन :** हातात अक्षता आणि फूल घेऊन म्हणा - "ॐ गं गणपतये नमः।" "हे श्री गणेशा, आज आम्ही आपल्या घरी भक्तीभावाने आपली स्थापना करीत आहोत. आपण आमच्या घरी सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्य घेऊन यावे. आमच्या पूजेचा स्वीकार करावा."

**स्थापना मंत्र :** "ॐ गं गणपतये नमः। आवाहयामि, स्थापयामि, पूजयामि।" (या नंतर मूर्तीवर अक्षता वाहाव्या.)

**संकल्प :** हातात पाणी आणि अक्षता घेऊन म्हणा - "मम सकलदुरितक्षयपूर्वक श्रीगणेशप्रसादसिद्ध्यर्थं, श्रीगणेशपूजनं करिष्ये।" (हातातील पाणी खाली सोडा आणि मनातील इच्छा सांगून संकल्प करा.)

**कलश स्थापना :** कलशात पाणी, अक्षता, सुपारी व नाणे टाका. त्यावर आंब्याची पाने आणि नारळ ठेवा. "ॐ वरुणाय नमः।" हा मंत्र म्हणा आणि कलशाला हळद-कुंकू लावा.

**स्नान (अभिषेक):** प्रथम पाण्याने, नंतर पंचामृताने (दूध, दही, तूप, मध, साखर) आणि शेवटी स्वच्छ पाण्याने अभिषेक करा. (शाडूची मूर्ती असल्यास प्रतीकात्मक स्नान करावे.)

**वस्त्र, गंध आणि अलंकार :** मूर्तीला वस्त्र अर्पण करा. "ॐ गं गणपतये नमः" म्हणून गंध, हळद-कुंकू, अक्षता, हार आणि फुले अर्पण करा.

**दुर्वा अर्पण :** गणपतीला दुर्वा अत्यंत प्रिय आहेत. "ॐ गं गणपतये नमः" म्हणत २१ दुर्वांची जुडी अर्पण करा.

**फुले अर्पण :** लाल फुले अर्पण करून "ॐ गं गणपतये नमः" म्हणा व हार अर्पण करा.

**नैवेद्य :** प्रथम मोदक अर्पण करा. "नैवेद्यं



समर्पयामि।" त्यानंतर फळे, दूध किंवा घरातील सात्विक नैवेद्य दाखवा.

**मंत्रजप :** ॐ गं गणपतये नमः (११, २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करा).

**धूप आणि दीप :** धूप/अगरबत्ती दाखवा. त्यानंतर दिवा दाखवून म्हणा "ॐ दीपज्योतिः परब्रह्म दीपज्योतिर्जनार्दनः। दीपो हरतु मे पापं दीपज्योतिन्मोऽस्तुते॥"

**आरती :** भक्तीभावाने "सुखकर्ता दुखहर्ता..." ही आरती म्हणा.

**प्रार्थना :** "हे गणराया, आमच्या घरातील सर्व विघ्ने दूर करा. आरोग्य, सुख, शांती आणि समृद्धी द्या. आमच्या हातून सत्कर्म घडू द्या. गणपती बाप्पा मोरया!"

### ॥ श्री गणपतीची आरती ॥

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥
जय देव जय देव जय मंगल मूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती ॥ जय देव
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची ऊटी कुंकुम केशरा ।
हीरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ॥ जय देव
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ॥ जय देव

**क्षमाप्रार्थना :** "आवाहनं न जानामि, न जानामि विसर्जनम्। पूजां चैव न जानामि, क्षमस्व गणनायक॥" (काही चूक-भूल झाली असल्यास क्षमा मागावी.)

**प्रसाद :** शेवटी उपस्थितांना प्रसाद वाटा आणि गणपतीला नमस्कार करा.

### ४. महत्त्वाचे गणेश मंत्र

**गणपती बीज मंत्र :**
ॐ गं गणपतये नमः ।

**गणेश गायत्री मंत्र :**
ॐ एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि
तन्नो दन्तिः प्रचोदयात् ॥

**वक्रतुंड मंत्र :**
वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

॥ गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया! ॥



## गणपती बाप्पांना तुळस का वाहत नाहीत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री गणपती म्हणजे चौदा विद्या, चौसष्ट कलांचे अधिपती. पण गणपती बाप्पांचे गणेश चतुर्थीच्या दिवशी घराघरांत मोठ्या जल्लोषात आगमन होते. बाप्पांच्या पूजनात दुर्वांची जुडी आणि मोदकाचा नैवेद्य अग्रस्थानी असतो. पण घराघरांत पुजली जाणारी तुळस मात्र बाप्पांना वर्ज्य मानली जाते. वर्षातून फक्त एकच दिवस गणेश चतुर्थीला ती गणपती बाप्पांना वाहिली जाते. सर्व देवदेवतांच्या पूजेत स्थान मिळविणाऱ्या तुळशीला श्रीगणेश पूजेत स्थान न देण्यामागे काही कथा सांगितल्या जातात.

पौराणिक कथेनुसार धर्मराजाची कन्या वृंदाने भगवान विष्णूंसोबत विवाह करण्याचा हट्ट केला होता. तेव्हा देवाशी लग्नाऐवजी मानवी वर शोधू असे म्हटले. त्यानंतर वृंदाने भगवान विष्णूंची आराधना केली. ध्यानधारणा आणि तप केले. एकदा ती भागीरथी नदीच्या काठावरून जात असताना ध्यानाला बसलेल्या श्रीगणेशांना तिने पाहिले. त्यांच्या तेजाने प्रभावित झालेल्या वृंदाने गणपती बाप्पांना हाक मारण्यास सुरूवात केली. यामुळे त्यांच्या तपस्येत अडथळा निर्माण झाला. याचे कारण गणपती बाप्पांनी तिला विचारले. त्यावर वृंदा म्हणाली, की मला तुमच्याशी विवाह करायचा आहे. गणपती बाप्पा म्हणाले, की मी मोहपाषात अडकणार नाही. मी ब्रह्मचर्याच्या मार्गावर आहे. मी विवाह करणार नाही. श्रीगणेशांच्या या उत्तराने आपला अपमान झाल्याचे समजून त्यांना शाप दिला, की तुमचा विवाह होईल. वृंदेने दिलेल्या शापावर गणपती बाप्पांनीही शाप दिला, की तुझा विवाह एका राक्षसासोबत होईल. माझ्या पूजेत तुला स्थान नसेल. गणपती बाप्पांच्या शापानंतर वृंदाला तिची चूक समजली. तिने गणपती बाप्पांची माफी मागितली. त्यानंतर वृंदाने गणपती बाप्पांची उपासना केली. तेव्हा प्रसन्न होऊन गणपती बाप्पा म्हणाले, की तुला माझ्या पूजेत वर्षातून फक्त एकदाच स्थान मिळेल. भाद्रपद शुक्ल चतुर्थीला तुळस वाहता येईल. या दिवशी वाहिल्या जाणाऱ्या २१ प्रकारच्या पत्रींमध्ये तुलाही स्थान असेल. मात्र, इतर कोणत्याही दिवशी तुळस वाहता येणार नाही. पुढच्या जन्मात वृंदाचा जन्म एका राक्षसाच्या पोटी झाला. त्यानंतर महापराक्रमी अशा राक्षसासोबत विवाह झाला. त्याचा मृत्यू होताच तिने चितेत उडी घेऊन प्राणत्याग केला आणि वृक्षरूपात तुळस झाली. त्यानंतर तुळशीला भगवान विष्णूंची पत्नी मानले जाऊ लागले. विष्णूंची पत्नी म्हणून तिची पूजा करतात. मात्र, तरीही गणपती बाप्पांच्या पूजेत आजही तुळस वर्ज्य मानली जाते. फक्त गणेश चतुर्थीच्या दिवशीच गणपती बाप्पांच्या पूजेत तुळशीला मान मिळतो. अशी ही तुळस औषधी पत्रीत समाविष्ट होऊन श्रींच्या चरणी समर्पित झाली.

## बाप्पांची मूर्ती कशी असावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मित्रांनो, ज्यांच्या घरी गणपती बाप्पा पूजले जातात किंवा जे गणेशोत्सव करतात त्यांनी हा लेख नक्कीच वाचावा. बरेच जण गरुडावर बसलेली/ सिंह / बैल वाहन असलेली किंवा उभी किंवा कुठल्या तरी देवाच्या खांद्यावर/हातावर असलेली मूर्ती सर्रास गणेशोत्सवासाठी आणत असतात. या मूर्ती शास्त्रोक्त नाहीत, अशा मूर्ती पूजाव्यात की नाही हा ज्याच्या-त्याच्या भावनेचा भाग आहे.

**शास्त्रोक्त मूर्ती म्हणजे नेमके काय?**

वेद आणि उपनिषदांमध्ये एखाद्या देवतेचे जसा वर्णन आहे त्या वर्णनाशी साधर्म्य असणाऱ्या मूर्ती म्हणजेच शास्त्रोक्त मूर्ती. आता तुम्ही म्हणाल, की आम्ही कुठे वेद-उपनिषदांचा अभ्यास करत बसणार. पण यातीलच एक श्रीगणेशांचे प्रभावी स्तोत्र आहे ज्याला आपण 'गणपती अथर्वशीर्षट म्हणतो. हे स्तोत्र बहुतांशी श्रीगणेशभक्तांना तोंडपाठ नसले तरी ऐकून माहीत आहेच. या स्तोत्रात श्रीगणेशांचे वर्णन आहे.

**"एकदन्तं चतुरहस्तं पाशमंकुश धारिणम ।
रदं च वरदम हस्तैर बीभ्राणं मुषकध्वजाम ।
रक्तम लम्बोदरं, शूर्पकर्णकम रक्तवाससम।
रक्तगंधानुलीप्तागं रक्तपुष्पेःसुपुजीतम ॥"**

श्रीगणेश एकदंत असून त्यांना ४ हात आहेत. वरच्या २ हातांमध्ये श्रीगणेशांनी पाश आणि अंकुश ही आयुधे धारण केली आहेत. त्यांचा एक हात वरदमुद्रेत असून,



त्यांचे वाहन मूषक आहे. हे लंबोदर म्हणजे यांचे उदर किंवा पोट मोठे अर्थात लंब आहे. यांचे कान सुपासारखे असून, रक्तवर्णाच्या गंधाची उटी यांना लावलेली आहे आणि हे रक्तवर्णीय फुलांनी पूजिले जातात. गणपती बाप्पांची मूर्ती शक्यतो बैठी/बसलेली असावी. कारण जेव्हा आपण प्राणप्रतिष्ठा करतो तेव्हा मूर्ती जीवंत असते. श्रीगणेशांचा प्राणमय देह त्या मूर्तीमध्ये प्रतिष्ठित होतो.

गणपती बाप्पा आपल्या घरी पाहुणे म्हणून आले आहेत. पाहुण्यांना असे उभे ठेवणे बरे वाटते का?

आणखी एक गोष्ट ध्यानात घ्यावी, की उभे गणपती बाप्पा कुठेही पूजले जात नाही. जुन्या श्रीगणेशांच्या पूजेतील मूर्ती पाहिल्या की लक्षात येते की सगळ्या मूर्ती बैठ्या आहेत.

बरेच कलाकार त्यांच्या कल्पकतेचा वापर करून श्रीगणेशमूर्तींची शरीरयष्टी बदलतात, की जे पूर्णपणे चुकीचे आहे. आपल्या हिंदू देवतांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा न करता सुद्धा जेव्हा पूजल्या जातात तरीही त्यात दैवी ऊर्जा प्रकट होते. कारण आपल्याकडील देवतांच्या मूर्ती या अतिशय विज्ञानबद्ध पद्धतीने आकारल्या आहेत. ऋषी-मुनी ध्यानस्त असताना जेव्हा त्यांना देवतांचे दर्शन व्हायचे तेव्हा ते त्यांचे वर्णन लिहून ठेवायचे. ज्याचा उपयोग पुढील पिढ्यांना ध्यान करताना झाला आणि यातून मूर्तीशास्त्र अस्तित्वात आले. देवी-देवतांना कुठलाही स्थूल देह नसतो. त्या प्राणमय आणि प्रकाशमय स्वरूपात असतात. या प्राणमय आणि प्रकाशमय रूपाचे ध्यान सामान्य माणसे करू शकत नाहीत. हे जाणून ऋषींनी मूर्ती निर्माण केल्या.

आता तुम्हीच ठरवा, की जेव्हा अशा फेरबदल झालेल्या मूर्ती तुम्ही आणता तेव्हा तुम्हाला याचा किती फायदा होतो? कारण पूजन होणाऱ्या मूर्तीने मधून स्पंदने उत्सर्जित होत असतात आणि जशी मूर्ती तशी स्पंदने हे झाले मूर्तीमधील साध्या बदलांचे. पण गेले ३-४ वर्षे बऱ्याच गणेशमूर्तींमध्ये प्रभावळी लावायची पद्धत चालू झाली आहे आणि या प्रभावळींमध्ये कीर्तिमुख असते. पण कीर्तिमुखाची शिंग आणि या गणेशमूर्तींमधील प्रभावळीतील कीर्तिमुखाचे शिंग यात खूप फरक आहे. ही शिंगे एखाद्या राक्षसाची शिंगे असल्यासारखीच वाटतात. हा काय प्रकार आहे मला काहीही समजलेले नाही. गणेशमूर्तींमध्ये राक्षसांच्या शिंगांची किंवा राक्षसी शिंगे असण्याचे कारण काय? असो. सावध करणे माझे काम होते. जे मी केले. बाकी ज्याची-त्याची इच्छा.

## 'ओम गं गणपतये नमः'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गणपती बाप्पांना २१ पत्री वाहतात. पत्री म्हणजे २१ प्रकारची पाने. प्रत्येक पानाचे औषधी महत्त्व आहे.

**२१ पत्रींची नावे**

१) माची - माका, भृंगराज
२) बोर - बदरी
३) बेल - बिल्वपत्र
४) दुर्वा - दूर्वा - ही सगळ्यात प्रिय
५) धोतरा - धोत्रा / धत्तूरा
६) मंदार - रुई, आक
७) तुळस - तुळशीपत्र (काही ठिकाणी गणपतीला तुळस वर्ज्य मानतात, पण पत्री मध्ये तिचा समावेश आहे)
८) शमी - शमीपत्र
९) आघाडा - अपामार्ग
१०) डोरली - बृहती, छोटी रिंगणी
११) कण्हेर - कर्वीर
१२) बाभूळ - विष्णुक्रांता (काही ग्रंथात बाभळीचे पान)
१३) पिंपळ - अश्वत्थ
१४) देवीदार - देवदार
१५) मरवा - मरूवक
१६)) अर्जुन - अर्जुनसादडा
१७) विष्णुक्रांता - गोकर्ण / शंखपुष्पी
१८) डाळिंब - दाडिम
१९) केतकी - केवडा (काही ठिकाणी केतकी ऐवजी जाई किंवा कदंब घेतात)
२०) आंबा - आम्रपत्र
२१) जाई - जातीपत्र / नागकेशर

पूजेत म्हणतात- "माचीपत्रं, बदरीपत्रं, बिल्वपत्रं..." असा श्लोक आहे.

**वाहताना नियम**

- पाने स्वच्छ धुवून, ताजी, कीडकी नसलेली घ्यावीत.
- शक्यतो २१ पैकी मिळतील तेवढी ५, ७, ११ तरी वाहावीत. सगळी नाही मिळाली तरी दुर्वा, बेल, शमी, मंदार आणि आंब्याची पाने तरी नक्की वाहतात.

## पार्थिव गणेश पूजन कसे कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्वत्र श्रीकृष्ण जयंती म्हणजेच गोकुळाष्टमी झाल्यानंतर सर्वांनाच वेध लागतात, ते लाडक्या गणपती बाप्पांच्या आगमनाचे. भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला पार्थिव गणेश पूजन केले जाते. एका मान्यतेनुसार श्रीगणेशांच्या अवतारांपैकी श्रीगणेश यांचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला झाला. महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला होता, असे काही दाखले पुराणांमध्ये आढळतात. मात्र, घरगुती गणेश पूजनाची सुरूवात नेमकी कधीपासून झाली, याबाबत महाभारत काळाचा संदर्भ दिला जातो. श्रीगणेशांसंदर्भात अनेक पौराणिक कथा विविध ग्रंथांतून संदर्भ मिळतात.

### महाभारत लेखक गणपती

महाभारताची रचना महर्षी व्यासांनी केली, हे आपल्या सर्वांना माहिती आहे. मात्र, महर्षी व्यासांनी महादेव आणि पार्वती देवींचे पुत्र गणपतींकडून लिहून घेतले. घराघरांत पार्थिव पूजनाची सुरूवात तेव्हापासून झाली, असे सांगितले जाते. महाभारताची रचना करताना महर्षी व्यास आणि गणपती यांनी एकमेकांना काही अटी घातल्या होत्या. गणपतींना आपल्या लेखनाच्या गतीबाबत आत्मविश्वास होता. गणपती महर्षी व्यासांना म्हणाले, की तुम्ही महाभारत कथा हळूहळू सांगणार असाल, तर मला कंटाळा येईल. त्यामुळे तुम्ही न थांबता सलग गोष्ट सांगावी. ही अट आपणास मान्य असेल, तर आणि तरच लेखनाची जबाबदारी मान्य करेन, अशी अट गणपतींनी घातली.

### महाभारत लेखनाचा श्रीगणेशा

व्यास महर्षी होते. गणपतींच्या अटीवर त्यांनी केवळ स्मित हास्य केले. महर्षी व्यास गणपतींना म्हणाले, की आपली अट मला मान्य आहे. मात्र, मी सांगितलेल्या वाक्याचा अर्थ समजला, उमगला, तरच ते वाक्य लिहून पूर्ण करायचे. अन्यथा अर्थ समजेपर्यंत थांबायचे, अशी अट महर्षी व्यासांनी ठेवली. गणपती तयार झाले आणि त्यांनी महाभारत लेखनाचा श्रीगणेशा केला. महर्षी व्यास नेमके काय सांगताहेत हे समजून घ्यायला अनेकदा गणपतींना विलंब व्हायला लागला. संपूर्ण महाभारत कथा समजून लिहून घेण्यासाठी तब्बल तीन वर्षांचा कालावधी लोटला, असे सांगितले जाते.



### घरोघरी पार्थिव गणपती पूजन केव्हापासून सुरू झाले?

महाभारत कथा पूर्ण होण्यात मोठा कालावधी लोटला. कित्येक दिवस एकाच ठिकाणी बसल्यामुळे गणपतींचे शरीर आखडून गेले. गणपतींच्या शरीरातील उष्णताही वाढायला लागली. वाढत जाणाऱ्या उष्णतेवर उपाय म्हणून गणपतीच्या सर्वांगावर मातीचा लेप लावण्यात आला. हा लेप लावून लावून जाडसर झाला. त्याला टणकपणा येऊन त्याने गणरायांच्या मूर्तीचा आकार घेतला. महाभारताची कथा लिहून पूर्ण झाल्यानंतर ही माती झटकून विसर्जित करण्यात आली. तेव्हापासून महाभारताचा लेखक म्हणून गणपतींचा सन्मान करण्यासाठी गणपतींची मातीची मूर्ती घडवून तिचे पूजन करण्याची परंपरा सुरू झाली, अशी एक कथा सांगितली जाते.

### महाभारतकालीन गणपती अवतार

श्रीगणेशांनी सत्ययुग, त्रेतायुग आणि द्वापारयुगात अवतार घेतल्याचे सांगितले जाते. श्रीगणेशांनी सत्ययुगात कश्यप आणि अदितीकडे महोत्कट विनायकाच्या अवतार धारण केला. या युगात गणपतींनी देवतान्तक आणि नरान्तक नावाच्या राक्षसांचा वध करून धर्माची स्थापना केली आणि आपल्या अवतारकार्याची सांगता केली. श्रीगणेश त्रेतायुगात मोरावर आरूढ होऊन प्रगट झाले. तर द्वापारयुगात श्रीगणेश उंदरावर बसून प्रगट झाले. श्रीगणेशांना पौराणिक पत्रकार किंवा लेखक असेही संबोधले जाते. कारण याच युगातील अवतारात त्यांनी महाभारत लिहिले होते, असे सांगितले जाते.

### पेशवे आणि घरगुती गणेशोत्सव

सवाई माधवरावांनी घरगुती गणेश पूजनाला उत्सवाचे मोठे रूप दिले. हा उत्सव भव्य स्वरूपात शनिवारवाड्यातील श्रीगणेश महालात भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून ते दशमीपर्यंत साजरा केला जाऊ लागला. दरबारातील अन्य मानकऱ्यांनीसुद्धा या कल्पनेचे स्वागत केले. शनिवारवाड्यातून फुला-पानांनी सजवलेल्या पालखीतून श्रीगणेशमूर्तीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येऊ लागली. शनिवारवाड्याजवळच उत्तरेच्या दिशेला असणाऱ्या नदीप्रवाहात श्रीगणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात येऊ लागले. सुरूवातीला दीड दिवस, पाच दिवस, दहा दिवस असा उत्सव होता. आजच्या काळातही ही वाटचाल सुरू असल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांच्या देशकार्यात गणपतींना देश-परदेशात महत्त्व प्राप्त झाले. लोकमान्यांनी जनसामान्यांची एकत्रीकरण स्वातंत्र्याविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी गणेशोत्सवाचा फार प्रभावी उपयोग केला.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)